आजचा दिनविशेष
१९२९ : पुण्यातील पार्वती देवस्थान दलितांसाठी खुले करण्यात आले.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र | वर्ष ३ रे | मंगळवार १४ ऑक्टोबर २०२५ | अंक २९२ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

SUN Tourism
All Tours घर से घर तक
सन टुरिझम
प्रस्तुत करते
देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !
आमच्या विशेष टूर पॅकेजेस
99222 22272 / 7602727555

# धक्कादायक! यवतमाळमध्ये सर्दी-खोकल्याच्या औषधामुळे ६ वर्षीय चिमुकल्याचा मृत्यू? सरकारचा मोठा आदेश!

यवतमाळ : लहान मुलांचा खोकला दूर व्हावा यासाठी दिल्या जाणाऱ्या कफ सिरप या औषधाबाबत सध्या वेगवेगळ्या चर्चा चालू आहेत. मध्य प्रदेशमध्ये तर हे औषध घेतल्याने अनेक मुलांचा मृत्यू झाला आहे. दोन वर्षांपेक्षा लहान मुलांना हे औषध देऊ नये, असे केंद्र सरकारतर्फे सांगण्यात आले आहे. दरम्यान, आता यवतमाळमध्येही असाच काहीसा प्रकार समोर आला आहे. येथे एका सहा वर्षाच्या मुलाला खोकल्याचा त्रास सुरू झाला होता. सुरुवातीला त्याला बरे वाटत होते. नंतर मात्र अचानकपणे त्याचा मृत्यू झाला आहे. त्यामुळेच त्याला देण्यात आलेल्या औषधांमुळे तर त्याचा मृत्यू झालेला नाही ना? अशी शंका उपस्थित केली जात आहे. सरकारने या प्रकरणाची दखल घेतली असून अन्न व औषध प्रशासनं विभागानं संबंधित मेडिकलमधून पाच औषधांचे नमुने जप्त करून प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवले आहेत. नेमकं काय घडलं?

शिवमच्या कुटुंबियांनी दिलेल्या माहितीनुसार शिवमचे वडील सैन्यात असून बरेली येथे कर्तव्यावर आहेत. दसऱ्यानिमित्त ते गावी आले असतांना 4 ऑक्टोबर रोजी शिवमला ताप, सर्दी, खोकला झाला. त्याच्यावर यवतमाळ येथील खासगी रुग्णालयात उपचार करण्यात आले. दोन दिवस त्याला बरं वाटलं. मात्र नंतर 6 तारखेला शिवमची प्रकृती खालावली.



खोकल्याच्या औषधामुळे चिमुकल्याचा मृत्यू?

त्यानंतर त्याला पुन्हा त्याच खासगी हॉस्पिटलमध्ये नेलं असता संबंधित रुग्णालय प्रशासनाने शासकीय रुग्णालयात जाण्यास सांगितलं. मात्र शासकीय रुग्णालयात नेले असता शिवमला मृत घोषित करण्यात आलं. औषध सुरु असताना अचानक झाला बेशुद्ध

सहा वर्षाच्या शिवमला सर्दी खोकल्याचा त्रास झाल्याने सुरुवातीला त्याला यवतमाळच्या खासगी रुग्णालयात नेले होते. त्यावेळी डॉक्टरांनी औषध लिहून दिले होते. औषधी घेतल्यावरही त्रास कमी न झाल्यामुळे दोन दिवसांनी परत डॉक्टरांना दाखविले. त्यांनी पुन्हा औषध दिले. हे औषध सुरू असताना अचानक तो बेशुद्ध झाला. खासगी रुग्णालयात नेल्यानंतर डॉक्टरांनी त्याला जिल्हा रुग्णालयात पाठविले. जिल्हा रुग्णालयात डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. औषधांमुळे शिवमचा मृत्यू झाल्या असावा अशी शंका आहे. परंतु शविच्छेदन अहवाल आणि औषधांचा अहवाल आल्यावरच नेमका काय प्रकार झाला हे कळेल असे शिवमच्या कुटुंबीयांनी सांगितले

## दोन चार दिवसांपासून खोकल्याचा त्रास

या घटनेनंतर अन्न व औषध प्रशासनं विभागानं संबंधित मेडिकलमधून पाच औषधांचे नमुने जप्त करून प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवले आहेत.
शिवमच्या मृत्यू आधी दोन-चार दिवस त्याला सर्दी खोकल्याचे औषधी देण्यात आले होते. त्या सात औषधांचे नमुने घेऊन तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत. तर खबरदारीचा उपाय म्हणून या औषधाचा वापर आणि वितरण थांबवण्याचे आदेश शासनाने दिला आहे. अन्न व औषधी प्रशासन विभागाचे सहाय्यक आयुक्त मिलिंद काळेश्वरकर यांनी तशी माहिती दिली आहे

# ज्ञानतीर्थ-२०२५ युवक महोत्सव लावणी कलाप्रकारामध्ये विद्यार्थी झाले मंत्रमुग्ध

नांदेड :- दि.१३ ऑक्टोबर सोनवार रोजी मंच क्र. एक क्रांतिवीर बिरसा मुंडा या मंचावर लावणी हा कलाप्रकार सादर करण्यात आला. अगदी पारंपारिक लावण्यापासून ते बैठकीच्या लावण्यापर्यंत विद्यार्थ्यांनी लावण्या सादर केल्या. विशेष म्हणजे मुलींनी तर लावण्या सादर केल्याच पण काही हौशी मुलांनीही लावण्या सादर केल्या. ङ्गपारवळ घुमतय कसं अगबाई पारवळ घुमतय कसंफ, अहो सांगा राया, सांगा मी कशी दिसते? माझ्यावरती रसिक जणांच्या नजरा, दिलबरा करिते तुला मुजराफ, ङ्गमाडीवरती उभे राहूनही वाट पाहिली काल वाटलं होतं तुम्ही याल राया वाटलं होतं तुम्ही यालफ, ङ्गपोटासाठी नाचते मी परवा कुनाचीफ, ङ्गकुण्या गावाचं आलं पाखरू, अहो कुण्या गावाचं आलं पाखरू. बसलय डौलात खुदु खुदु हसतय गालातफ अशा अनेक बहारदार लावण्या विद्यापीठ परीक्षेतील चारही जिल्ह्यांमधील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सादर केल्या. उपस्थित विद्यार्थ्यांनी तर टाळ्या आणि शिट्ट्या वाजून प्रतिसाद दिला. हा कार्यक्रम बघण्यासाठी मुद्दामून प्र-कुलगुरु डॉ.अशोक महाजन, विद्यापीठाची कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. सुर्यकांत जोगदंड, डॉ. डी. एन. मोरे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालन डॉ. राजेश्वर दुडु कनाळे, ग्रामीण टेक्निकल अँड मॅनेजमेंट कॅम्पसचे संचालक डॉ. विजय पवार, अधिसभा सदस्य यांच्यासह अनेक प्राध्यापक गुरुजन वर्ग उपस्थित होते. मंच क्र. एकवर सल्लागार मंडळ सदस्य डॉ. प्रताप देशमुख, डॉ. बालाजी भंडारे, डॉ. बालाजी सूर्यवंशी, डॉ. गजानन पाटील, डॉ. एम. आर. जाधव, डॉ. कमलाकर चव्हाण यांनी धुरा सांभाळला आहे.

# शिवसेना बीड जिल्ह्याच्या वतीने व डॉक्टर सेलच्या वतीने आज आरोग्य तपासणी व उपचार शिबीर पार पडले

गेवराई दि.11(प्रतिनिधी) :- गेवराई तालुक्यातील गोदाकाठी असलेल्या गावातील पूरग्रस्तांची आरोग्य तपासणी व उपचार तसेच जनावरांची तपासणी व औषधोपचार करण्यासाठी अनाथांचा नाथ म्हणून विशेष अशी ओळख असलेले महायुतीचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे व खासदार श्रीकांत शिंदे तसेच शिवसेना डॉक्टर सेलचे प्रदेशाध्यक्ष - डॉ.धनंजय पडवळ,

पूर परिस्थितीचे गांभीर्य व साथीच्या रोगाचे गांभीर्य लक्षात घेऊन बीड जिल्ह्याचे तिन्ही जिल्हाप्रमुख यांनी स्वतः उपस्थित राहून या आरोग्य शिबिराचे आयोजन नियोजन केले व शिवसेनेच्या माध्यमातून व डॉक्टर सेलच्या माध्यमातून ही जनसेवा ईश्वर सेवा घडून आणून पूरग्रस्तांचे हात बनले अनिल दादा जगताप (शिवसेना जिल्हाप्रमुख बीड), सचिन भैय्या मुळूक (जिल्हाप्रमुख बीड) व स्वप्निल भैय्या गलधर यांच्या संकल्पनेतून शिवसेना डॉक्टर सेलच्या वतीने आज शनिवार रोजी मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबीराचे आयोजन करण्यात आले होते शिबीराचा लाभ पूरग्रस्त गावातील 5 ते 6 हजार नागरिकांनी घेतला हे शिबीर तालुक्यातील भोगलगाव, राहेरी, बोरगांव थडी, गंगावाडी, पांढरी, मिरगाव, पांगुळगाव, सावळेश्वर, खामगाव, नागझरी, म्हाळसा पिंपळगाव या पूरग्रस्त गावातील नागरिक व जनावरांची आरोग्य तपासणी



करून आणि औषधोपचार करण्यात आले

यावेळी अकरा गावातील नागरिकांनी शिवसेना पदाधिकारी व डॉक्टर सेलचे आभार मानले तसेच या शिबिरासाठी गेवराई तालुक्यातील शिवसैनिकांनी याचे काटेकोरपणे नियोजन केले . यावेळी गेवराई तालुक्याचे शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख अँड नारायण शिंदे विधानसभा प्रमुख नवनाथ जि गवते शहर प्रमुख मुकेश अण्णा महाजन युवा सेना तालुका प्रमुख बबन मोघे,ओबीसी तालुकाप्रमुख बाळासाहेब खेडकर संतोष तपसे डाके मामा बालाजी कारंडे व तालुक्यातील मोठ्या प्रमाणात शिवसैनिक यामध्ये उपस्थित होते

# हिंदू महिलांवरील अत्याचाराच्या घटनेत सर्व आरोपी जिहादीच असतात, संग्राम जगताप

## दिवाळीची सर्व खरेदी ही फक्त हिंदूंच्या दुकानातून करा

राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार संग्राम जगताप यांनी कही दिवसांपूर्वी मोठं वक्तव्य केलं होतं, दिवाळीची सर्व खरेदी ही फक्त हिंदू दुकानदारांकडूनच करा, सर्व नफा हा हिंदू व्यावसायिकांना मिळाला पाहिजे असं त्यांनी म्हटलं होतं, यावरून वातावरण चांगलंच तापलं, वातावरण तापलेलं असतानाच आता पुन्हा एकदा संग्राम जगताप यांनी वादग्रस्त वक्तव्य केलं आहे. हिंदू महिलांवरील अत्याचाराच्या घटनेत सर्व आरोपी जिहादीच सापडतात, असं त्यांनी म्हटलं आहे. संग्राम जगताप यांच्या या नव्या वक्तव्यामुळे आता आणखी एका वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे. अत्याचाराच्या शंभर केसेसमध्ये शंभर महिला हिंदू सापडतात आणि सर्व आरोपी जिहादी असतात, आपल्यातीलच काही मानसिक खतना झालेले लोक आरोपींना पाठीशी घालतात असं वक्तव्य राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार संग्राम जगताप यांनी केलं आहे. संगमनेर तालुक्यातील घारगाव येथे आदिवासी महिलेवर झालेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ सकल हिंदू समाजाच्या वतीने जनआक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते, या मोर्चामध्ये बोलताना जगताप यांनी हे वक्तव्य केलं आहे. जे हिरवे साप फणा काढतील त्यांना ठेचण्याची वेळ आली आहे. या लोकांना वेळोवेळी माफ करण्याचे पाप आमच्यासकट अनेकांनी केले, मात्र आता प्रायश्चित करण्याची वेळ आली आहे. असं देखील आमदार जगताप यांनी यावेळी म्हटलं.



पुढे बोलताना ते म्हणाले की, याला जी सुरुवात झाली ती बेकरी सुरू झाल्यापासून, हळूहळू लहान मुले, भगिनी तेथे बेकरीमधील पदार्थ घेण्यासाठी जातात. महिलांना पदार्थ देण्याच्या बहाण्याने त्यांचे मोबाईल नंबर घेतले जातात. घारगाव मधील महिला अत्याचाराची घटना घडली. वृत्तपत्रात महिलेचे नाव , जात - धर्म दिली जात नाही. सर्वात जास्त अत्याचार हे हिंदू समाजातील महिलांवर होतात आणि त्यातील आरोपी एका विशिष्ठ समाजाचे असतात. घारगावच्या घटनेतील एक सहआरोपी आपल्या समाजातील आहे, पन तो त्या मानसिकतेचा नाही. प्रशासनाने अनाधिकृत मस्जिदी 15 दिवसात काढून घ्याव्यात, त्यासाठी आता सातत्याने पाठपुरावा करत राहावं लागणार आहे, पठार भागात अचानक ही लोक वाढायला लागली आहेत, असंही यावेळी जगताप यांनी म्हटलं आहे.

# वैचारिक लोकांनी राजकारणात सक्रिय सहभाग घेत प्रत्येक सभागृहात जायला हवं

### चांगली माणसं बाजूला गेली तर लोकशाही धोक्यात येईल - सेवकराम जाधव

परळी वैजनाथ : राजकारण पैसेवाल्यांचं.. राजकारण गुंडापुंडांचं असं म्हणून दूर न राहता, वैचारिक लोकांनी प्रत्येक सभागृहात जाणे आवश्यक आहे. चांगल्या विचाराच्या नागरिकांनी राजकारणा पासून दूर न जाता सक्रिय सहभाग नोंदवण्याची गरज निर्माण झाली असल्याचे मत सामाजिक कार्यकर्ते सेवकराम जाधव यांनी व्यक्त केले आहे.

सद्यपरिस्थितीमधे राजकीय पटलावर पैसेवाले व गुंडप्रवृत्तीचे लोक जास्त प्रमाणात दिसून येतात. त्याकारणाने वैचारिक विचारधारा असणारी माणसं राजकारणापासून साहजिकच दूर जात आहेत. आपलं हे क्षेत्र नाही असं म्हणत सक्रिय सहभाग घेण्यास धजावत नाहीत. प्रत्येक निवडणुकीत असंच होत गेलं, चांगली माणसं पूर्णपणे बाजूला



फेकली गेली तर येणाऱ्या काळात खूप मोठे धोके निर्माण होतील.

समाजहिताचे भान असलेली वैचारिक माणसं अनेक क्षेत्रात आहेत. सभागृहात प्रत्येक क्षेत्रातील अभ्यासकांची आवश्यकता आहे. नगर परिषद, पंचायत समिती, जिल्हा परिषद अशा ठिकाणी समाजसेवक, पत्रकार, साहित्यिक,विचारवंत, शिक्षक, व्यापारी, शेतकरी यासह विविध घटकांचे तत्वशील प्रतिनिधी सभागृहात असायला हवेत. त्याशिवाय लोकहिताची कामं होणार नाहीत.

म्हणून वैचारिक लोकांनी राजकारणा पासून दूर न जाता सक्रिय सहभाग घेत प्रत्येक सभागृहात जाणं आवश्यक आहे. चांगली माणसं बाजूला गेली तर लोकशाही धोक्यात येईल. असे मत सामाजिक कार्यकर्ते सेवकराम जाधव यांनी व्यक्त केले आहे.

# हिंदू बांधव स्वत:ची रक्षा करण्यासाठी सक्षम आहे. :-शेख युनूस

बीड (प्रतिनिधी) बीड जिल्ह्यातच नव्हे तर पूर्ण महाराष्ट्र हिंदू बांधव स्वत:ची रक्षा स्वत: करू शकतो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या लेकरांना स्वत:ची रक्षा करायची शिकू नका. राजकीय स्वार्थासाठी जातीय तेढ निर्माण करण्याचे काम करू नका. खरंच तुम्ही हिंदुत्ववादी असताना तर शेतकऱ्याच्या हक्कासाठी, मराठा समाजाच्या आरक्षणासाठी सरकारशी लढा. सरकारला आरक्षण देण्यासाठी भाग पाडा. खासदार, आमदारांनी राजीनामे द्यावे.या महाराष्ट्रात अठरापगड जातीचे लोक गुण्या गोविंदाने नांदत आहे. धर्माच्या नावाखाली राजकारण करू नका, जनता खूप हुशार झालेले आहे. स्वत:च्या स्वार्थासाठी गु खाऊ नका.आणि त्याखाली माती ही खाऊ नका. जनतेला गुण्या गोविंदाने राहू द्या.



बीड जिल्हा एकात्मतेचे संदेश देणारा जिल्हा आहे, त्यात संग्राम जगताप,गोपीचंद पडळकर आणि भीमा कोरेगाव मध्ये दंगली घडवणाऱ्या मिलिंद एकबोटे सारख्या सडक्या विचारांच्या लोकांना प्रशासनाने जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी परवानगी नाकारावी. शेवटी एकच लक्षात ठेवा. धर्म वेगळे असू शकतात, पण मानवता हा सर्वात मोठा धर्म आहे. आणि संकटाच्या काळात माणूसच माणसाला साथ देतो,धर्म नाही.

# रस्ते विकासाच्या नावाखाली हजारो वर्षे जुनी असलेली झाडे तोडून पर्यावरणाचा हास होत आहे

**वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरेया जगतगुरु तुकोबारायांचा अभंगा नुसार सजीवांचं अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी आणि पर्यावरणाचं रक्षण करण्यासाठी वृक्षारोपण केलं पाहिजे. विनोद गर्जे**

पाटोदा प्रतिनिधी.... बीड ते अहिल्यानगर (पाटोदा मार्गे)या रस्त्यावरील अतिशय पुरातन असणारे वड, पिंपळ,लिंब,निलगिरी तथा इतर मोठी मोठी वृक्ष जें आम्ही लहान पनापासून पाहत आलोयेत, ज्याचं वयं किमान १०० वर्षांपेक्षा जास्तच आहे. अशी डेरेदार झाडे जी सावली देत आहेत वं निसर्ग संवर्धन करण्यात अगदी पुढे आहेत.अशी प्रचंड मोठी झाडे रस्ता-रुंदीकरणाच्या नावाखाली अतिशय अमानुषपणे तोडताना आम्ही येता जाता पाहतोय.पण मुक्या आणि अंध व्यक्तीगत गुमान जावं लागतंय ही बाब प्रचंड दुःख देणारी आहे. खुप वेदना होतायेत शासनाने खरंच याचा विचार केला पाहिजे. ही डेरेदार झाडे म्हणजे या मार्गाची ओळख होय. मागे काही दिवसांपूर्वी अगदी राज्य आणि केंद्र सरकार स्तरावर कितीतरी कोटी झाडे लावण्याचा उपक्रम खूप मोठया



प्रमाणात पैसे खर्च करुन राबवला होता, पण दुर्दैव म्हणजे आज त्यातील किती झाडे जिवंत आहेत? याचा शोध घेतला तर नक्कीच घोर निराशा झाल्याशिवाय रहाणार नाहीं.अहो आपण झाडे लावत नाहीत, लावले तर त्यांची हिपाजत करत नाहीत आणि आपल्या पूर्वजानी लावलेली झाडे अगदी विकास, रस्ता, अद्योगिकरण, वसाहत,कारखाने किंवा इतर थोतांड कारण पुढं करुन तोडून विकत आहोत, ही बाब एक देशप्रेमी म्हणून खूप जिव्हारी लागतीये. "आज अशी स्थिती आहे उगाचं कागदोपत्री झाडे लावण्यापेक्षा जी आहेत त्यांना जपल तरी खूप कमावली."पण दुर्दैव म्हणजे ते सुद्धा होताना दिसतं नाही. निसर्गावर केलेल्या अतिक्रमण आणि अत्याचार यामुळे निसर्गानें आपणास कायमच अनेक इशारे दिलेले आहेत. मागील काही वर्षात बऱ्याचदा पडलेले दुष्काळ, मागील महिन्यात झालेली अतिवृष्टी, अवेळी पडणारा पाऊस, भूकंप, महाप्रलंय आणि भूस्खलन यामुळे अतोनात जीवीतहानी तथा आर्थिक नुकसान होऊन देखील मानव ध्यानावर यायचं नावं घेत नाहीये. विकास, रस्ते आणि आत्मनिर्भर भारत या स्वप्नाच्या नावाखाली अशी निसर्ग आणि तत्सम घटकांची हेळसांड करुन मानवीय जीवन सुखर होण्याऐवजी नक्कीच येणाऱ्या काळात अधिक अडचणीत येणार आहे. आणि हो

"एक भारतीय म्हणून हा असला विकास जो झाडे तोडून होणार असेल तर तो नाहीं झालेलाचं बरं आहे साहेब " जगातील अनेक विकसीत देशात अनेक मोठी झाडे रस्त्याच्या मध्यभागी आहेत, अनेक खेळाच्या मैदानाच्या मध्ये किंवा जवळपासं आपण पाहतो. ते निसर्ग आणि व्रक्ष यांना जीवापाड जपतात म्हणून समृद्ध आहेत आणि राहतील.आपण लाखो कोटी खर्च करुन, करोडो झाडाचे बळी घेऊन अनेक रस्ते केलेत. मान्य आहे, त्यामुळे दळणवळणाला गती मिळाली पण....वाहनानं मूळे होणारे प्रदूषण आटोक्यात आणणारे झाडे नष्ट झालेत. भारतातील सगळेच मोठी शहरे जगातील अधिक प्रदूषित असणाऱ्या शहराच्या यादीत अग्रस्थानी आहेत यांचाचं अर्थ आपण विकास, रस्ते आणि उद्योगाचा नावाखाली निसर्ग तथा पर्यायी आरोग्य नष्ट करत आहोत.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार १४ ऑक्टोबर २०२५
https://lokaarambh.com



संपादकीय

## पर्सनल लोनमध्ये वय का महत्त्वाचे? जाणून घ्या



तुम्ही पर्सनल लोन घेण्याचा विचार करत आहात का? असं असेल तर काही नियम तुम्हाला माहिती असावेत. कारण, लोन घेण्यात अडचणी ठरणाऱ्या अनेक बाबी आहेत, यात सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे तुमचे वय. तुमचे वय किती आहे आणि ते पर्सनल लोन घेण्याच्या नियमात बसते का, याविषयी आज जाणून घेऊया. पर्सनल लोन आजकाल बहुतेक लोकांची गरज बनली आहे. लग्न असो, घराची दुरुस्ती असो किंवा अचानक वैद्यकीय खर्च असो, बँकेकडून पर्सनल लोन घेणे सोपे वाटते. परंतु बऱ्याच वेळा लोकांना हे समजत नाही की कर्जासाठी अर्ज करताना वय सर्वात मोठी भूमिका बजावते. बँका केवळ तुमचे उत्पन्न आणि क्रेडिट स्कोअर पाहत नाहीत, तर तुमचे वय, तुम्ही कर्जासाठी किती पात्र आहात आणि तुम्हाला कोणत्या अटींवर पैसे मिळतील हे देखील ठरवतात. वय आपल्याला सांगते की आपल्याकडे किती कमाईचा वेळ शिल्लक आहे आणि तुम्ही किती वर्षे स्थिर उत्पन्न मिळवू शकता. हेच कारण आहे की, बँका वेगवेगळ्या वयोगटातील लोकांना वेगवेगळ्या प्रकारे न्याय देतात. योग्य वयात अर्ज केल्यास कर्ज सहज मंजूर तर होतेच, शिवाय व्याजदर आणि हप्तेही सोपे होतात. बहुतेक बँका 21 ते 60 वर्ष वयोगटातील लोकांना पर्सनल लोनसाठी पात्र मानतात. सुरुवातीच्या काळात जेव्हा उत्पन्न स्थिर नसते, तेव्हा बँका अधिक सावध असतात. त्याच वेळी, बँका अशा लोकांना कर्ज देखील देतात जे कमी कालावधी आणि कठोर अटींवर सेवानिवृत्तीच्या जवळ आहेत.

वय आणि कर्जाचा कालावधी

तुमचे वय 25 किंवा 30 वर्ष असेल तर बँका तुम्हाला दीर्घ मुदतीची म्हणजेच 5 ते 7 वर्ष देऊ शकतात. पण जर तुम्ही वयाच्या 55 व्या वर्षी कर्ज घेतले तर बँका हे सुनिश्चित करतात की सेवानिवृत्तीपूर्वी हप्ते संपतील. अशा परिस्थितीत, कार्यकाळ कमी राहतो म्हणजे 2 ते 3 वर्षे.

वय आणि व्याज दर

बँका तरुण आणि स्थिर नोकऱ्या असलेल्या ग्राहकांना कमी जोखीम मानतात. यामुळे, 30 ते 45 वयोगटातील लोकांना सहसा सर्वोत्तम ऑफर मिळतात. परंतु 55 वर्षांपेक्षा जास्त वयाच्या ग्राहकांना थोडे जास्त व्याज किंवा मर्यादित ऑफर दिल्या जातात कारण बँकेसाठी जोखीम वाढते.

(डिस्क्लेमर: या आर्टिकलमध्ये देण्यात आलेली माहिती व उपाय हे सामान्य ज्ञानावर आधारित आहेत. आमचा याला दुजोरा नाही. ते अवलंबण्यापूर्वी तज्ज्ञांचा सल्ला जरूर घ्यावा.)

# बीड जिल्हा परिषदेचे आरक्षण जाहीर ६१ जागांपैकी ३० महिला राखीव

बीड जिल्हा परिषद निवडणुकांसाठी अखेर आरक्षणाचा तक्ता जाहीर करण्यात आला आहे. एकूण ६१ जागांसाठी विविध प्रवर्गानुसार आरक्षण निश्चित करण्यात आले असून त्यामध्ये महिलांसाठी तब्बल ३० जागा राखीव आहेत. यामध्ये सर्वसाधारण महिला,ओबीसी महिला तसेच अनुसूचित जाती– जमाती महिला या प्रवर्गांचा समावेश आहे. ही आरक्षण यादी जाहीर झाल्यानंतर सर्वच राजकीय पक्षांच्या गोटात चढाओढ सुरू झाली आहे आगामी निवडणुकीसाठी ही आरक्षणाची रचना महत्त्वाची ठरणार असून अनेक तालुक्यांत राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तालुकानुसार आरक्षणाचे तपशील गेवराई (९ जागा) रेवकी – सर्वसाधारण महिला तलवाडा – सर्वसाधारण जातेगाव – सर्वसाधारण गढी – सर्वसाधारण धोंडराई – सर्वसाधारण महिला उमापूर – ओबीसी (महिला) चकलांबा – ओबीसी मादळमोही – सर्वसाधारण महिला पाडळसिंगी – सर्वसाधारण माजलगाव (६




जागा) केसापुरी – अनुसूचित जाती गंगामसला – ओबीसी टाकरवण – सर्वसाधारण महिला तालखेड – अनुसूचित जाती पात्रुड – सर्वसाधारण महिला दिंद्रुड – सर्वसाधारण महिला वडवणी (२ जागा) उपळी – ओबीसी (महिला) चिखलबीड – सर्वसाधारण बीड (८ जागा) राजुरी – सर्वसाधारण महिला बहिरवाडी – सर्वसाधारण महिला पिंपळनेर – सर्वसाधारण नाळवंडी – सर्वसाधारण महिला पाली – सर्वसाधारण महिला नेकनूर – ओबीसी लिंबागणेश – सर्वसाधारण चौसाळा – सर्वसाधारण शिरूर–पाटोदा (७ जागा) घाटशिळ पारगाव – सर्वसाधारण महिला रायमोहा – सर्वसाधारण पाडळी – ओबीसी (महिला) पिंपळनेर – सर्वसाधारण डोंगरकिन्ही – ओबीसी अंमळनेर – ओबीसी पारगाव घुमरा – सर्वसाधारण आष्टी (७ जागा) दौलावडगाव – सर्वसाधारण महिला धामणगाव – सर्वसाधारण धानोरा – सर्वसाधारण महिला लोणी (स) – सर्वसाधारण महिला कडा – सर्वसाधारण महिला मुर्शदपूर – सर्वसाधारण आष्टा – सर्वसाधारण महिला केज (७ जागा) विडा – सर्वसाधारण महिला येवता – ओबीसी (महिला) आडस – ओबीसी होळ – अनुसूचित जाती (महिला) चिंचोलीमाळी – ओबीसी (महिला) नांदुरघाट – ओबीसी (महिला) युसूफवडगाव – सर्वसाधारण धारूर (३ जागा) तेलगाव – अनुसूचित जाती (महिला) भोगलवाडी – अनुसूचित जमाती आसरडोह – ओबीसी परळी (६ जागा) सिरसाळा – सर्वसाधारण पिंप्री – अनुसूचित जाती माडवा – सर्वसाधारण महिला मोहा – अनुसूचित जाती जिरेवाडी – अनुसूचित जाती (महिला) धर्मापुरी – ओबीसी अंबाजोगाई (६ जागा) जोगाईवाडी – सर्वसाधारण घाटनांदूर – सर्वसाधारण महिला पट्टीवडगाव – सर्वसाधारण बर्दापूर – ओबीसी (महिला) चनई – ओबीसी (महिला) पाटोदा म. – अनुसूचित जाती (महिला) आरक्षणाचे एकूण स्वरूप एकूण जागा – ६१ महिला राखीव जागा – ३० अनुसूचित जाती–जमाती प्रवर्ग – १० ओबीसी प्रवर्ग – १८ सर्वसाधारण प्रवर्ग – ३३ या आरक्षणानुसार आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकी साठी उमेदवार ठरविण्याच्या हालचालींना वेग आला आहे. अनेक तालुक्यांमध्ये महिला नेतृत्वाला मोठी संधी मिळाल्याने महिला उमेदवारांचा सहभाग यंदा लक्षणीय वाढण्याची शक्यता आहे.राजकीय पक्षांकडून संभाव्य उमेदवारांची नावे ठरविण्याची चढाओढ लवकरच सुरू होणार असल्याचे वृत्त आहे.

# खासदार बजरंग सोनवणेंच्या केज शहरात चायनिज सेंटर चालकावर धारदार शस्त्राने हल्ला गंभीर जखमींवर उपचार सुरू

केज (प्रतिनिधी): खासदार बजरंग सोनवणे यांच्या केज शहरातील बसस्थानकासमोर असलेल्या चायनिज सेंटरवर सोमवारी रात्री उशिरा हल्ल्याची धक्कादायक घटना घडली. या हल्ल्यात सय्यद इर्शाद (वय अंदाजे ३०) हा युवक गंभीर जखमी झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सय्यद इर्शाद हे बसस्थानकासमोर चायनिज सेंटर चालवत होते. रात्री अज्ञात व्यक्तींनी त्यांच्यावर धारदार शस्त्राने हल्ला करून त्यांना गंभीर जखमी केले. घटनास्थळी नागरिकांनी तत्काळ मदत केली व इर्शाद यांना केज उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर प्रकृती गंभीर असल्याने त्यांना स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई येथे हलविण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी जागेचा पंचनामा करून गुन्ह्याचा तपास सुरू केला असून, हल्ल्याचे नेमके कारण समजलेले नाही. या घटनेनंतर केज शहरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणली आहे.




# गंगाखेड येथे ग्रामीण पोलीस ठाण्याच्या निर्मितीसाठी पाठपुरावा करणार-डीआयजी उमाप

मकरंद चिनके गंगाखेड

शहराची वाढती लोकसंख्या यामुळे एकाच पोलिस ठाण्यावर पडणारा ताण कमी व्हावा यासाठी गंगाखेड येथे ग्रामीण पोलीस ठाण्याची निर्मिती व्हावी यासाठी गंगाखेड व्यापारी महासंघाचे अध्यक्ष दगडू सोमाणी यांच्यावतीने अनेकवेळा मागणी करण्यात येत आहे नकीच आपल्या मागणीचा विचार करून गंगाखेड येथे ग्रामीण पोलीस ठाण्याच्या निर्मितीसाठी पाठपुरावा करणार असल्याचे नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी म्हटले ते (दिनांक 11 ऑक्टोबर शनिवार) रोजी गंगाखेड पोलीस ठाण्यामध्ये आयोजित संवाद बैठकीमध्ये ते बोलत होते.

येथील पोलिस ठाण्यामध्ये नागरिकांच्या तक्रार निवारणासाठी संवाद बैठकीचे आयोजन करण्यात आले होते या बैठकीस नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, आ.डॉ.रत्नाकरराव गुट्टे यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी उमाप यांनी म्हटले की नागरिकांच्या समस्या नोंदवून त्यांना पोलीस प्रशासनाच्या वतीने मेसेज मार्फत



फीडबॅक देण्यात येणार आहे महिला तक्रार निवारणासाठी भरोसा सेलची येथेच स्थापना करण्यात येईल अशा विविध समस्यांचे निवारण करण्यात येणार असल्याचे म्हटले बैठकीस उपस्थित असलेले परभणीचे अप्पर पोलीस अधिक्षक सुरज गुंजाळ,उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्र शिरतोडे,उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.समाधान पाटील,पोलिस निरीक्षक श्रीकांत डोंगरे यांनी नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन नोंदऊन घेतल्या

आयोजित संवाद बैठकीस शहरातील शांतता समितीचे दगडूशेठ सोमानी, जावेद इनामदार,ज्ञानोबा अनंतवार, सचिन दहिवाळ,सुनिता घाडगे, गुणाबाई सोनवणे,सूर्यमाला मोतीपवळे,महादेव गीते,प्रा.डॉ.राजीव आहेरकर, अब्दुल अशपाक,जगदीश तोतला,संजय

# केजच्या कोरडेवाडी गावचा साठवण तलावासाठी 30 ते 35 वर्षापासूनचा संघर्ष , स्वप्निल वरपे

## प्रशासन कोरडेवाडी गावच्या ग्रामस्थांना न्याय देणार आहेत का.

बीड प्रतिनिधी .अंकुश गवळी कोरडेवाडी या गावचा गेली 30 ते 35 वर्षापासून साठवण तलावासाठी संघर्ष चालू आहे. केज तालुक्यातील शासन प्रशासन इथली संत्री मंत्री खासदार आमदार पुढारी आणि एक वर्षांपूर्वी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांनी देखील गावकऱ्यांना कॉल द्वारे आश्वासन दिले होते तरी देखील आतापर्यंत आश्वासन दिली पण पूर्ण कोणीच केले नाही. कोरडेवाडी हे गाव गेले 30-35 वर्ष झाले कोरडेवाडी साठवण तलावाच्या मागणीसाठी लढत आहे आत्तापर्यंत या तालुक्याचे जिल्ह्याचे शासन प्रशासन अधिकारी प्रतिनिधी पुढारी संत्री मंत्री आमदार खासदार यांनी फक्त या गाववाल्यांना आश्वासन दिली पण पूर्ण काम कोणीच केले नाही आज गेली 30-35 वर्ष झालं हे गाव साठवण तलावासाठी संघर्ष करत आहे कारण या गावांमध्ये पाणी नाही म्हणुन इथले ग्रामस्थ आत्महत्या करण्यापर्यंत गेले आहेत. कारण या गावांमध्ये कुठल्या प्रकारचं प्रशासनाच्या अधिकाऱ्यांच्या प्रतिनिधींच्या पुढाऱ्यांच्या आश्वासनाला बळी पडून वैतागून गेली आहेत कारण या गावांमध्ये फक्त पाणी नाही म्हणून इथला 20 एकर असणारा शेतकरी विदर्भात जाऊन दीड एकर शेती असणाऱ्या पाशी आपलं पोट भागवण्यासाठी ऊस तोडत आहे. पाण्या वाचून या गावातील मुलांचे लग्न होईना झालेत पाणी नाही म्हणून ह्या शेतीला भाव नाहीये आणि नाईलाजाने या गावातील मुलं आपलं पोट भागवण्यासाठी बाहेर जिल्ह्यात जाऊन काम करत आहेत. आणि या गावचा शेतकरी ऊस तोडून कर्ज काढून आपल्या मुलाला बाहेर जिल्ह्यात शिकायला पाठवत आहे. या सगळ्याला कारण फक्त एकच आहे कोरडेवाडीचा साठवण तलाव गेल्या वर्षी धर्मवीर छत्रपती संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठान यांच्या माध्यमातून राजश्रीताई उंबरे पाटील यांनी कोरडेवाडी या गावात साठवण तलावाच्या प्रश्नासाठी अकरा दिवस बिन अन्न पाण्याचं आमरण उपोषण केलं होतं त्यावेळीस देखील महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांनी उपोषणाच्या अकराव्या दिवशी समस्त कोरडेवाडी गावकरी मंडळी समोर कॉल द्वारे सांगितलं होतं उपोषण स्थगित करा तुमची साठवण तलावाची मागणी मी लवकरच मान्य करत आहे पण आज त्याच गोष्टीला व त्यांच्या आश्वासनाला पूर्ण एक वर्ष झाला आहे तर त्याच अनुषंगाने आज कोरडेवाडी या गावात पुन्हा नव्याने कोरडेवाडी गावकऱ्यांच्या बळावर व धर्मवीर छत्रपती संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठान संस्थापक अध्यक्ष बाळराजे दादा वारे पाटील यांच्या माध्यमातून आज अकरा दिवस झालं राजश्रीताई उंबरे पाटील यांचा कोरडेवाडी या गावात आजचा उपोषणाचा अकरावा दिवस आहे आणि आज उपोषण 11 दिवस उलटूनही कोणताच प्रतिनिधी व प्रशासनाचा अधिकारी



उपोषण स्थळे भेट देण्यात आलेला नाहीये . आत्ताच काही दिवसाखाली केज तालुक्यातील तहसील कार्यालय समोर बैलगाडी मोर्चा घेऊन तहसील कार्यालयासमोर बैलगाडी जाळण्यात आली होती तर त्यावेळेस आठ दिवसानंतर कुठे तहसीलदाराने उपोषण स्थळी भेट दिली व दोन दिवसा खाली कोरडेवाडी या ग्रामस्थांकडून आपल्या साठवण तलावाच्या प्रश्नासाठी जलसमाधी आंदोलन करण्यात आले होते कारण सरकारचं व प्रशासनाचे लक्ष कसं केंद्रित करावं यासाठी हे आंदोलन करण्यात आले होते तरी देखील सरकारला जाग आलेली नाहीये तर त्याच अनुषंगाने उद्या दिनांक 14 10 2025 रोजी केज तालुक्यातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात मोठ्या संख्येने रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे आणि जर का येत्या दोन दिवसांमध्ये या आंदोलनाची व उपोषणाची दखल घेण्यात नाही आली तर सरकारला हे शेतकऱ्याचे आंदोलन मोठे भोवनार. कारण सरकारला आम्ही त्यांच्या तिजोरीतील संपत्ती किंवा त्यांच्या जमिनी नाही मागत आहोत आम्ही आमच्या हक्काचं पाणी मागत आहोत व आम्ही आमच्या मागणीसाठी गेली 30-35 वर्ष झाले संघर्ष करत आहोत जर का दोन दिवसांमध्ये आमची दखल घेतली नाही तर या मराठवाड्यामध्ये शेतकरी काय करू शकतो हे नक्कीच मात्र सरकारला दाखवून देईल.असे मत सामाजिक कार्यकर्ते स्वप्निल वरपे पाटील यांनी केले आहे.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार १४ ऑक्टोबर २०२५
https://lokaarambh.com


## स्वयंपाकघरातील 'ही' भाजी खाल्ल्यामुळे वजन होईल झटपट कमी...




आजची वाईट जीवनशैली आणि खाण्याच्या चुकीच्या सवयींमुळे वजन कमी करणे आणि लठ्ठपणा कमी करणे हे अनेक लोकांसाठी एक मोठे आव्हान बनले आहे. प्रत्येकजण वजन कमी करण्याचे मार्ग आणि पोटाची चरबी कमी करण्याचे मार्ग शोधत राहतो. तज्ञांच्या मते, काकडी हा एक उत्तम आहार आहे, जो वजन कमी करण्यात मदत करू शकतो. आहारात काकडीचा समावेश करणे अत्यंत सोपे आहे. पोटाची चरबी कमी करण्यात हे खूप प्रभावी मानले जाते . तथापि, वजन कमी करण्यासाठी आहारात काकडीचा समावेश कसा करावा हे बर्याच लोकांना माहित नसते. वजन कमी करण्यासाठी खाण्यापूर्वी किंवा नंतर काकडी खावे की नाही याबद्दल बरेच लोक संभ्रमित आहेत? काकडीमध्ये 95% पाणी असते. या व्यतिरिक्त, हे व्हिटॅमिन के, पोटॅशियम, मॅग्नेशियम तसेच अँटीऑक्सिडंद्व आणि कुकुर्बिटासिन सारख्या विशेष संयुगे देखील समृद्ध आहे, जे त्यांच्या दाहक-विरोधी गुणधर्मांसाठी ओळखले जातात. आहारात काकडीचा समावेश केल्याने शरीर हायड्रेटेड राहते. जेवण सुरू करण्यापूर्वी काकडी खाणे भूक नियंत्रित करण्याचा आणि पचन सुधारण्याचा एक सोपा आणि नैसर्गिक मार्ग आहे. काकडीमध्ये पाणी आणि फायबरचे प्रमाण खूप जास्त असते, ज्यामुळे आपल्याला त्वरीत पोट भरल्यासारखे वाटते. यासह, आपण जेवणादरम्यान कमी कॅलरी वापरता, जे वजन नियंत्रित करण्यासाठी उत्तम आहे. पोषण तज्ञ बर्याचदा या सवयीची शिफारस करतात. जेवणानंतर काकडी खाल्ल्याने ते पॅलेट क्लीन्झरसारखे कार्य करते. जेवण केल्यानंतर काकडी खाल्ल्याने आम्लपित्त शांत होते. यात भरपूर फायबर असते, ज्यामुळे फुशारकी किंवा गॅस होत नाही. जर आपल्याला वजन कमी करायचे असेल तर आपण आहारात काकडी खाऊ शकता, कोशिंबीरीमध्ये कापून, स्मूदीमध्ये किंवा थेट स्नॅक म्हणून खाऊ शकता. सकाळी ह्याचे सेवन करणे अधिक फायद्याचे असते. वजन कमी करण्यासाठी दिवसा ते खावे. सकाळी काकडी खाल्ल्याने संपूर्ण रात्रीच्या झोपेनंतर आपले शरीर पुन्हा हायड्रेट होण्यास मदत होते, कारण ते त्वरित पाणी भरते. काकडी हा रात्रीच्या वेळी हलका आणि कमी कॅलरीयुक्त स्नॅक आहे, जो जड पचनामुळे आपल्या झोपेत व्यत्यय आणणार नाही. जर तुम्हाला ऍसिड रिफ्लक्सचा त्रास होत असेल तर काकडी पोटासाठी सौम्य असते. रात्री हे पदार्थ खाल्ल्याने त्यांना ॲसिडिटीची समस्या होत नाही. काकडी आरोग्यासाठी खूप चांगली आहे, परंतु दिवसभरात त्याचे जास्त सेवन करू नका. दररोज 1 ते 2 मध्यम काकडी खाणे सामान्यत: सुरक्षित मानले जाते. यात असलेले फायबर वजन कमी करण्यास मदत करते.

# चिंचवली येथील वनवासी कल्याण आश्रमात विद्यार्थ्यांना दिवाळी फराळाचे वाटप.

नवी मुंबई: नेरुळ येथील गीत गजानन भजनी मंडळ आणि यूथकौन्सिल नेरुळ या सेवाभावी संस्थांच्या संयुक्त विद्यमाने पनवेल तालुक्यातील चिंचवली येथील वनवासी कल्याण आश्रमातील विद्यार्थ्यांना दिवाळी सणाचे औचित्य साधून दिनांक १२.१०.२५ रोजी दिवाळी फराळाचे वाटप व इतर खाऊचे वाटप करुन येणारी दिवाळी गोड केली. वसतीगृहात एकूण ३९ विद्यार्थी वास्तव्यास आहेत. मंडळाच्या श्रीमती शैलजाताई केळकर यांनी लाडू आणि चिवडा स्वत: घरी बनवून आणला होता. याप्रसंगी मंडळाच्या, संगीत क्षेत्रातील नामांकित तज्ञ शिक्षक श्रीमती अपर्णाताई दाबके, श्रीमती



रेखाताई वाळवेकर, श्रीमती स्वातीताई पालकर तसेच यूथकौन्सिलचे पदाधिकारी सुभाष हांडे देशमुख, दत्ताराम आंब्रे, दिलीप चिंचोळे , सूर्यकांत गावडे, रवींद्र कांबळे अंकुश शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. याच कार्यक्रमांतर्गत पर्यावरणाचे भान राखून आश्रमाच्या परिसरात फणस व जांभूळ या फळझाडांचे रोपण करण्यात आले. वसतीगृहातील विद्यार्थ्यांची व्यवस्था पाहणारा अमित भुरबुडा यांनी संस्थेतील विद्यार्थ्यांच्या दिनक्रमाची माहिती सविस्तरपणे सर्वांना दिली. मुलांनी स्वागत गीत, देशभक्तीपर गीते सादर करुन तसेच विविध प्राण्यांचा आवाज काढून दाखवून आपापल्या कला सादर केल्या. संस्थेतील संपूर्ण वातावरण, शिस्त, मुलांची अभ्यासातील प्रगती पाहून उपस्थित पाहुणेमंडळींनी समाधान व्यक्त केले. भजनी मंडळाच्या श्रीमती अपर्णाताई दाबके यांनी मुलांना "हीच आमुची प्रार्थना" हे गीत शिकवले आणि त्यांच्याकडून सामूहिकरित्या वदवूनही घेतले. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुभाष हांडे देशमुख यांनी केले तर शेवटी श्रीमती रेखाताई वाळवेकर यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.

# उपक्रमशील शिक्षक व एनसीसी ऑफिसर विश्वनाथ पांचाळ सर यांना राष्ट्रीय प्राऊड लीडरशिप आयकॉन पुरस्कार

गांधी बाल मंदिर हायस्कूल मध्ये गेली ३३ वर्षे कार्यरत असून विविध शैक्षणिक उपक्रमात भाग घेऊन अनेक पारितोषिक ही मिळवलेली आहेत. लोकसंख्या शिक्षण या उपक्रमाची राज्यस्तरावर निवड झाली होती. राष्ट्रीय छात्र सेनेच्या ,(NCC) माध्यमातून स्वच्छ भारत अभियान, साक्षरता अभियान, पर्यावरण रक्षण, तंबाखू मुक्त अभियान, हेल्मेट वाटप प्लास्टिक बंदी, कापडी पिशव्यांचा वापर , मतदार जनजागृती , स्वच्छ नदी अभियान,रस्ता सुरक्षा अभियान , संविधान दिन , स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव ,माझी माती माझा देश, युद्ध नौका भेट, कारगिल विजय दिवस असे विविध उपक्रमातून भावी आदर्श सैनिक घडविण्याच्या प्रयत्न करीत आहे . आज अनेक कॅडेट भारतीय सैन्याचा भरती झालेले आहेत. शाळेत सहशालेय विविध चित्रकला स्पर्धा ,फलकलेखन, करोना काळातील शैक्षणिक साहित्य वाटप, किराणा वाटप, लशीकरण मोहीम,अशा विविध सामाजिक उपक्रमाव्दारे सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न करत आहेत. लोक गौरव राष्ट्रीय एकात्मता परिषद पनवेल आयोजित राष्ट्रीय प्राऊड लीडरशिप आयकॉन पुरस्कार गांधी बाल मंदिर हायस्कूल कुर्ला येथील शिक्षक व एनसीसी ऑफिसर श्री विश्वनाथ गोपाळ पांचाळ यांना लेफ्टनंट कमांडर निलेश झोपे सर,,प्रसिद्ध गझलकार ए. के.शेख सर , प्रसिद्ध अभिनेत्री आदिती सार गंधार , प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक श्री अल्ताफ शेख यांच्या हस्ते साहित्य मंदिर सभागृह वाशी या ठिकाणी प्रदान करण्यात आला सदर पुरस्काराबद्दल शाळेतील सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी, शिक्षक , पर्यवेक्षक श्री रवींद्र खोंडे सर ,मुख्याध्यापक श्री अनिल पांचाळ सर यांनी या पुरस्काराबद्दल सरांचे अभिनंदन केले आहे.

# पूरग्रस्तांना दि पूना मर्चटस चेंबरचा मदतीचा हात भमू,परंडा तालूक्यातील आपत्तीग्रस्तांना धान्यांचे वाटप

पुणे : नुकत्याच झालेल्या ढगफुटीमुळे भूम, परंडा तालुक्यातील अनेक गावांत पाणी शिरल्याने मोठे नुकसान झाले आहे. आठवडाभरानंतरही जनजीवन विस्कळीतच आहे. अनेक संसार उघड्यावर आले आहेत. शेतीसह घरांचे भरून न निघणारे नुकसान झाले आहे. पशुधन गमावल्यामुळे शेतकरी हतबल झाले आहेत. त्यामुळे सामाजिक जबाबदारीचे भान बागळत पुण्यातील दि पुना मर्चंटस चेंबरतर्फे भूम, परंडा ताक्यात एक हजार धान्यांच्या कीटचे सोमवारी वाटप करण्यात आले.

धाराशिव जिल्ह्यातील भूम तालुक्यातील उळूप, साडेसांगवी, बुंहाणपूर, चिंचपूर ढगे, सुकटा, चिंचोली या गावात नदीच्या पूराचे पाणी शिरले होते, तर परंडा तालुक्यातील वाघे गव्हाण या गावात पाणी शिरल्याने घरांसह पशुधनाचे मोठे नुकसान झाले होते. अतिवृष्टी आणि पूरामुळे येथील जनजीवन पूर्णत: विस्कळीत झाले आहे. आपत्तीच्या या धक्क्यातून अनेक जण अद्यापही सावरलेले नाहीत. या कठीण काळात एक छोटीशी म दत म्हणून धान्यांच्या रूपाने दि पूना मर्चंटस चेंबरतर्फे प्रत्यक्ष गावात जावून ग्रामस्तांना धान्यांच्या कीटचे वाटप करण्यात आले.

दि पूना मर्चंटस चेंबर ही व्यापारातली शिखर संस्था आहे. राज्यासह देशात ज्या ज्या वेळी संकटे आली त्या त्या वेळी ही संघटना मदतीचा हात देते. याआधी किल्लारी भुकंपानंतर या संघटनेने त्या भगात मोठे मदतकार्य केले होते. दि पूना मर्चंटस चेंबरचे सचिव इश्वर नहार, संचालक दिनेश मेहता, सदस्य हरिराम चौधरी, भरत भाटे, प्रणव गुगळे यांनी प्रत्यक्ष गावांत जावून मदत केली. धाराशिव जिल्हा प्रशासनातर्फे उपविभागीय अधिकारी रेवैयाह डोंगरे, तहसीलदार जयंवत पाटील, नायक तहसिलदार अमर आटोळे, शिक्षण विस्तार अधिकारी सूर्यकांत साळुंके, सहशिक्षक समाधान शिकेतोड यांनी सहकार्य केले. अशी माहिती दि पूना मर्चटस चेंबरचे अध्यक्ष राजेंद्र बाठिया यांनी दिली.

मदतीमुळे ग्रामस्थांच्या डोळ्यात आनंदाश्रू

अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसाणीमुळे गावातील प्रत्येक घटक संकटात सापडला आहे. बाधितांना या संकटातून बाहेर काढण्यासाठी अनेक संस्था, व्यक्ती मदतीचा हात देत आहेत. पुण्यातील दि पूना मर्चंटस चेंबरतर्फे धान्यांची मदत मिळताच साडेसांगवी, सुकटा, चिंचोली या गावातील ग्रामस्तांच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले. काही ज्येष्ठ ग्रामस्तांनी आश्रू पुसत दि पूना मर्चटस चेंबरच्या पदाधिर्कायांना आशीवार्ददिले.

राजस्तान फाऊंडेशतर्फे भांड्यांचे वाटप

पुण्यातील राजस्तान फाऊंडेशतर्फे आपत्तीग्रस्त भागातील ज्या नागरिकांच्या घरात पाणी शिरले आहे. अशा कुटुंबांना गृहउपयोगी वस्तूंची आवश्यकता होती. त्यामुळे ६५० कुंटुबांना गृहउपयोगी भांड्यांच्या कीटचे वाटप करण्यात आले. या फाऊंडेशनचे संपर्क मंत्री ओकप्रकाश चौधरी, एम. आर. सूर्या सोशल फांऊडेशनचे कुलदीप पाटील, रमेश चौधरी, अरविंद चौधरी यावेळी उपस्थित होते.

-----------

# धर्मसेवेतील निष्ठेचा आदर्श – श्री. शिवराज नाईकवाडे यांचा धर्मभूषण पुरस्काराने सन्मान

धर्मसेवा, श्रद्धा आणि निष्ठेच्या प्रतीक म्हणून पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीचे सचिव श्री. शिवराज नाईकवाडे यांना प्रज्ञा स्तोत्र अध्ययन वर्ग आणि तेजस्वी फाऊंडेशन, ठाणे यांच्या वतीने "धर्मभूषण" पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा गौरव त्यांच्या धर्मसेवा, मंदिरसेवा व समाजोपयोगी कार्यातील उल्लेखनीय योगदानासाठी देण्यात आला. देवस्थान समिती सचिव हे मंदिरातील दैनंदिन कामकाज, उत्सव-योजना, भक्तांच्या सुविधा, देणग्यांची पारदर्शक नोंद आणि पुजारी व सेवेकऱ्यांमध्ये समन्वय राखण्याचे महत्त्वाचे कार्य पाहतात. प्रामाणिक, सेवाभावी आणि कार्यक्षम सचिव असल्यास देवस्थानाची व्यवस्था सुयोग्य राहते आणि भक्तांचा विश्वास दृढ होतो. श्री. नाईकवाडे या सर्व जबाबदाऱ्या कार्यक्षमतेने पार पाडत आहेत. संस्थेच्या संस्थापिका आणि संचालिका प्रा प्रज्ञा




पंडित यांच्या हस्ते नाईकवाडे यांना गौरवीत करण्यात आले. याप्रसंगी त्या म्हणाल्या, "श्री. शिवराज नाईकवाडे यांच्या धर्मसेवा व समाजोपयोगी कार्यासाठी त्यांचा गौरव करणे आमच्यासाठी अभिमानास्पद आहे." श्री. नाईकवाडे यांच्या कार्याची दखल घेऊन, त्यांच्या पुढील सेवाभावी प्रयत्नांसाठी मन:पूर्वक शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या आहेत.

# दहावी, बारावी परीक्षेचं वेळापत्रक जाहीर

महाराष्ट्रात दरवर्षी हजारो विद्यार्थी इयत्ता दहावी आणि बारावीची परीक्षा देतात. ही दोन्ही शैक्षणिक वर्षे विद्यार्थ्यांच्या भविष्याला कलाटणी देणारी असतात. त्यामुळेच या दोन्ही इयत्तांच्या परीक्षा कधी होणार? या परीक्षेचं वेळापत्रक काय असेल? याची उत्सुकता समस्त विद्यार्थ्यांना तसेच पालकांनाही असते. एकदा वेळापत्रक आणि परीक्षेच्या संभाव्य तारखा जाहीर झाल्या की विद्यार्थी अभ्यासाचे नियोजन चालू करतात. असे असतानाच आता शिक्षण विभागाने इयत्ता दहावी आणि बारावीच्या वार्षीक परीक्षेचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. परीक्षा नेमकी कधी होणार?

मिळालेल्या माहितीनुसार इयत्ता बारावीची परीक्षा 10 फेब्रुवारी ते 18 मार्चदरम्यान होणार आहे.माहिती तंत्रज्ञान आणि सामान्यज्ञान या ऑनलाईन




परीक्षाही याच काळात होतील. तर 20 फेब्रुवारी ते 18 मार्च 2026 या काळात इयत्ता दहावीची परीक्षा होणार आहे. प्रात्यक्षिक परीक्षा, तोंडी परीक्षा कधी होणार?

इयत्ता बारावीची प्रात्यक्षिक परीक्षा 23 जानेवारी 2026 ते 9 फेब्रुवारी 2026 या कालावधीत होईल. तर इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांची तोंडी परीक्षा 2 फेब्रुवारी 2026 रोजी सुरू होईल. वेळापत्रक एवढ्या लवकर का जाहीर केले जाते?दरवर्षी हजारो विद्यार्थी दहावी आणि बारावीच्या परीक्षेला बसतात. या परीक्षांच्या नियोजनाचे वर्ष कित्येक महिन्यांआधीच करावे लागते. तांत्रिक बाबींची अडचण भासू नये तसेच परीक्षा केंद्रांचे नियोजन, उत्तर पत्रीकांचे नियोजन अशा सर्वच गोष्टी शिक्षण विभागाला पाहाव्या लागतात. यासह विद्यार्थ्यांनाही परीक्षेच्या तारखेनुसार आपल्या अभ्यासाचे नियोजन करता यावे, विद्यार्थ्यांनी आपल्या अभ्यासाचे वेळापत्रक तयार करून त्यानुसार अभ्यासाला लागावे, यामुळेच इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर केले जाते.

विद्यार्थ्यांनी अभ्यासाला लागण्याचे आवाहन

एकदा वेळापत्रक जाहीर झाल्यानंतर शिक्षकांनाही शालेय पातळीवर आपले नियोजन करता येते. अभ्यासक्रम कसा शिकवायचा? त्यासाठीची तयारी काय असायला हवी? विद्यार्थ्यांच्या सराव चाचण्या कशा आणि कधी घ्यायच्या? याचे शाळांना नियोजन करणे सोपे होते. त्यामुळेदेखील या सर्व बाबींचा विचार करूनच इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर केले जाते. आता विद्यार्थ्यांनी अभ्यासाला लागावे, असे आवाहन शिक्षण विभागाकडून करण्यात आले आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

मंगळवार १४ ऑक्टोबर २०२५
https://lokaarambh.com



# एसटी कर्मचाऱ्यांना 6000 हजार रुपये दिवाळी भेट ! आणि 12,500 रुपये सण उचलही मिळणार

राज्यभरातील ८५ हजाराहून अधिक एसटी कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड होणार आहे. यंदाच्या दिवाळीत एसटी कर्मचाऱ्यांना प्रत्येकी ६ हजार रुपयांची दिवाळी भेट ( सानुग्रह अनुदान ) देण्याचा निर्णय राज्य सरकारने जाहीर केला आहे. तसेच पात्र कर्मचाऱ्यांना दिवाळी अग्रीम १२,५०० रुपयांची सण उचल देखील मिळणार आहे. तसेच वेतन वाढीचा फरक वेतनासोबत देण्यासाठी महामंडळाला दरमहा ६५ कोटी रुपये देण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केला आहे. त्यामुळे एसटी कर्मचाऱ्यांनी दिवाळीच्या तोंडावर आंदोलन करण्याचा निर्णय मागे घेतल्याचे सूत्रांकडून समजते. एसटी महामंडळ कर्मचाऱ्यांनी ऐन दिवाळीच्या तोंडावर आपल्या अनेक प्रलंबित मागण्यासाठी चक्का जाम आंदोलनाचा निर्णय जाहीर केला होता. या आंदोलनामुळे एसटीच्या प्रवाशांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागण्याची शक्यता होती. मात्र, आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी कामगार संघटनांच्या प्रतिनिधींची बैठक झाली आहे. त्यानंतर एसटी कर्मचाऱ्यांना ६००० रुपये दिवाळी भेट आणि १२,५०० रुपये उचल देण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला आहे. त्यामुळे आता यंदाची दिवाळी गोड जाणार आहे. या निर्णयात सरासरी ७५०० वेतनवाढ फरक हप्ता प्रति महिन्याला देण्याचे देखील मान्य करण्यात आले आहे. एसटी महामंडळाला त्यासाठी सरकार दर महिन्याला ६५ कोटी रुपये देणार आहे. आंदोलनाचा निर्णय स्थगित ?

एसटीमधील महाराष्ट्र कामगार संघटना संयुक्त कृती समितीमधील १६ संघटनाआणि अन्य एक महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेस या संघटनानी



सोमवार दिनांक १३ ऑक्टोबर २०२५ पासून चक्का जाम आंदोलनाचा इशारा दिला होता. मात्र, आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या उपस्थितीत कामगार संघटनांची एक बैठक झाली. या बैठकीत बहुतांशी मागण्यावर तोडगा काढण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. त्यामुळे १३ ऑक्टोबरच्या रात्रीपासून चक्काजाम आंदोलनाचा निर्णय मागे घेतल्याचे सांगण्यात येत आहे.

### काय आहेत मागण्या

२०१८ पासून एसटी कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता फरक देण्यात आलेला नाही. सन २०२० ते २०२४ या कालावधीतील वेतनवाढ फरकाची रक्कम थकीत आहे. याशिवाय इतर अनेक रक्कमा थकीत आहेत. एसटी कर्मचाऱ्यांची एकूण ४००० कोटी रुपयांपेक्षा जास्त थकीत रक्कम मिळालेली नाहीत. थकीत रक्कम कर्मचाऱ्यांना मिळण्यासाठी एक वेळचा पर्याय म्हणून सरकारने ही रक्कम एसटीला दिली पाहिजे अशी मागणीही कृती समितीच्या वतीने करण्यात आली आहे.


# विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या मागणीला यश

राज्यातील अंशतः अनुदानित शिक्षकांच्या वाढीव टप्प्यानुसार वेतनाच्या ऑक्टोबर महिन्याच्या तरतुदीचा अनुदान वितरण आदेश पारित करावा अशी मागणी राज्य विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने करण्यात आली होती या मागणीला यश आले आहे. आज सोमवार दिनांक १३ ऑक्टोबर रोजी अंशत: अनुदानित शिक्षकांच्या वाढीव टप्पा अनुदान ऑक्टोबर महिन्याच्या वेतनासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. सदर निधी वितरणाचा शासन आदेशही आज जारी करण्यात आला आहे. राज्यातील सर्व आजी माजी शिक्षक आमदार आणि विविध शिक्षक संघटना यांच्यासह ८ व ९ जुलै २०२५ रोजीच्या राज्यव्यापी शाळा बंद आंदोलनाचे हे यश असल्याचे विनाअनुदानित शाळा कृती समितीचे राज्य उपाध्यक्ष खंडेराव जगदाळे यांनी सांगितले. सदर शासन आदेश निर्गमित झाल्याने सध्या अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे आणि समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. राज्यातील विनाअनुदानित शाळेतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या खात्यावर वाढीव २० टक्के अनुदाना वितरित करण्यासाठी २५ ऑगस्ट २०२५ रोजी शासन निर्णय झाला. परंतु ऑगस्ट सप्टेंबर आणि आता ऑक्टोबर महिना सुरू झाला तरी देखील वाढीव टप्प्याप्रमाणे अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या खात्यावर वाढीव टप्प्याचे वेतन झाले नाहीत. २० टक्के वाढीव टप्प्याप्रमाणे निधीची तरतूद व्हावी यासाठी अनेक दिवसापासून आजी व माजी शिक्षक आमदार यांच्यासह शिक्षक संघटना प्रयत्न करीत होत्या. परंतु शासनस्तरावर कोणतीच हालचाल होत नसल्याने शेवटी विनाअनुदानित शाळा कृती समितीने वाढीव टप्पा नुसार निधीची तरतूद करून २० ऑक्टोबर २०२५ पूर्वी वेतन शिक्षकांच्या खात्यात जमा व्हावे न झाल्यास २१ ऑक्टोबर रोजी दिवाळी दिवशीच राज्यातील सर्व शिक्षण उपसंचालक आणि सर्व जिल्ह्यातील शिक्षणाधिकारी यांच्या दारात काळी दिवाळी साजरी करण्याचा इशारा देत आंदोलनाचे हत्यार उपसले. विना अनुदानित शाळा कृती समितीच्या या इशारा आंदोलनाची शासन आणि प्रशासनाने गांभीर्याने दाखल घेत प्रत्यक्षात टप्पा वाढ निधी वितरणाच्या कामाला सुरुवात केली. सोमवार दि.१३ ऑक्टोबर २०२५ रोजी अंशत: अनुदानित शिक्षकांच्या वाढीव टप्पा अनुदानाप्रमाणे ऑक्टोबर महिन्याच्या वेतनासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. सदर निधी वितरणाचा शासन आदेश आज सोमवार रोजी शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. येत्या दोन-चार दिवसात दिवाळीच्या सणाच्या निमित्ताने ऑक्टोबर पेड इन ऑक्टोबर असे वाढीव टप्पा अनुदाना प्रमाणे होणारे वेतन शिक्षकांच्या खात्यात जमा होणार आहे. या कामी आ. ज्ञानेश्वर म्हात्रे व माजी आमदार श्रीकांत देशपांडे यांच्यासह राज्यातील इतर आजी माजी शिक्षक आमदार आणि विविध शिक्षक संघटनांचे प्रयत्न कामी आले असल्याचे राज्य उपाध्यक्ष खंडेराव जगदाळे यांनी सांगितले. सध्या अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे आणि समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.



**अनिल धमने पाटील नांदेड जिल्हा प्रतिनिधी नांदेड : – स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ व ग्रामीण टेक्निकल अँड मॅनेजमेंट कॅम्पस, विष्णुपुरी, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ङ्ग्ज्ञानतीर्थ २०२५फ आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सवात संभाजीराव केंद्रे महाविद्यालय, जळकोट च्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले ग्रॅज्युएट भिकारी – विडंबन अभियान हे सादरीकरण विशेष चर्चेचा विषय ठरले. या विडंबन नाट्य प्रयोगात आजच्या तरुण पिढीसमोर उभ्या असलेल्या बेरोजगारी, राजकारणातील हस्तक्षेप, महागाई, भ्रष्टाचार आणि शैक्षणिक धोरणातील विसंगतींवर मार्मिक भाष्य करण्यात आले. उच्च शिक्षण घेतल्यानंतरही योग्य रोजगार न मिळाल्याने विद्यार्थ्यांची झालेली मानसिक व सामाजिक घुसमट या नाटकातून प्रभावीपणे मांडण्यात आली. या प्रयोगाचे संघ प्रमुख प्रशांत कांबळे होते. त्यांनी राजकीय परिस्थिती व समाजातील बदलत्या वास्तवाचे जिवंत चित्र उभे केले. सादरकर्त्यां मध्ये पंकज नामवाड, गणेश लिंतांदळे, प्रणाली तोरलुडवार, लाडके धनश्री, गडकर आणि मुस्कान शेख यांचा उत्स्फूर्त सहभाग नोंदवला होता.**

# ओबीसींचे आरक्षण धोक्यात आल्याने वृद्धाची आत्महत्या



**राज्य सरकारने हैदराबाद गॅझेटनुसार मराठा समाजाला सरसकट ओबीसीतून आरक्षण दिल्याने आपल्या मुलांचे भविष्य अडचणीत आले असून त्यांना नोकरी मिळणार नसल्याच्या चिंतेतून एका साठ वर्षीय वृद्धाने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना सोमवारी सकाळी उघडकीस आली आहे.शिरूर तालुक्यातील पाडळी येथील बबन तुळशीराम दुधाळ वय ६० वर्ष यांनी आपल्या राहत्या घरातील पत्र्याच्या खाली असलेल्या अँगलला गळफास लावून जीवन संपवले आहे.मुलगा कृष्णा दुधाळ याने दिलेल्या माहितीनुसार शासनाने मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसी मध्ये आरक्षण दिल्याने आपल्या मुलांना ओबीसी मधून नोकरी लागणार नसल्याने नैराश्य येऊन १३ ऑक्टोबर रोजी सकाळी साडेसहा वाजण्याच्या पूर्वी आत्महत्या केल्याची फिर्याद पोलिसांत दिली आहे.**

# मागण्या मान्य झाल्यामुळे सेवानिवृत्त मुख्याध्यापक सावंत यांचे उपोषण मागे

गेवराई तालुक्यातील जिल्हा परिषद माध्यमिक शाळा फुलसांगवी येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापक सुधाकर सावंत यांना सेवानिवृत्तीचे लाभ मिळावेत यासाठी सोमवार दिनांक १३ ऑक्टोबर २०२५ रोजी अमर उपोषण सुरू केले होते. या उपोषणाची दखल घेऊन त्यांना रजा रोखीकरण आणि गट विमा आदी लाभ देण्यात आल्यामुळे त्यांनी रात्री उशिरा आपले उपोषण मागे घेतले. दरम्यान या उपोषणाची दखल घेऊन मुख्य लेखा व वित्त अधिकारी आबासाहेब घायाळ, लेखाधिकारी विकास ढोले, आरसूळ यांनी उपोषण स्थळी भेट दिली. वित्त विभाग आणि शिक्षण विभागाने तात्काळ दखल घेऊन सेवानिवृत्तीचे लाभ देण्याचे पत्र सोमवारी दिले. बीड जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य लेखा व वित्त अधिकारी आबासाहेब घायाळ यांनी या उपोषणाला



भेट देऊन लाभ देण्याचे आश्वासन दिले. रात्री ८.३० वाजता शिक्षणाधिकारी यांनी रजा रोखीकरण तात्काळ देण्याचे मंजुरीचे आदेश दिले. जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाचे कार्यालय अधीक्षक रंगनाथ राऊत, कनिष्ठ प्रशासनाधिकारी जोशी यांच्या उपस्थितीत सदर पत्र दिल्यानंतर सावंत यांनी आपले उपोषण मागे घेतले. यावेळी अधिकारी कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा सेवानिवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी गौतम चोपडे, सेवानिवृत्त गटशिक्षणाधिकारी पंडित गोपाळघरे, मुख्याध्यापक कांतीलाल लाड, खतीब सर, श्याम घाडगे सर, बाळासाहेब शिंदे, मुख्याध्यापक अरविंद राऊत, आदिनाथ सवाशे, सामाजिक कार्यकर्ते श्रीकृष्ण खेत्रे, सेवानिवृत्ती इंजि. भोरे, पत्रकार नारायण नागरे आदींची उपस्थिती होते.

# अंबाजोगाई शहरातील चुकीच्या पद्धतीने केलेली प्रभाग फेररचना व मतदार याद्यामधील नावांची अनाधिकृतपणे केलेली अदलाबदल तात्काळ दुरुस्त करावी- राजकिशोर मोदी

**नुकतीच अंबाजोगाई शहरातील प्रभागाची फेररचना नगर परिषद प्रशासनाच्या वतीने जाहिर करण्यात आली आहे. या प्रभागाच्या फेररचनेनुसार तयार करण्यात आलेल्या प्रारूप मतदार याद्यामध्ये मतदाराच्या नावांची बहुतांश ठिकाणी आदलाबदल करण्यात आली आहे. प्रशासनाच्या वतीने करण्यात आलेली मतदारांची आदलाबदल ही त्या त्या मतदारांना सुद्धा अमान्य असल्याची तक्रार मतदार करत आहेत. त्यामुळे जाहीर करण्यात आलेली प्रभागरचना व प्रारूप मतदार याद्या या तात्काळ दुरुस्त करण्याची मागणी एका निवेदनाद्वारे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी उपजिल्हाधिकारी अंबाजोगाई यांच्या मार्फत राज्याचे मुख्यमंत्री , मुख्य निवडणूक आयुक्त, जिल्हाधिकारी बीड, पालकमंत्री बीड, तहसीलदार अंबाजोगाई तसेच मुख्याधिकारी नगर परिषद अंबाजोगाई यांना देण्यात आले आहे. सदर निवेदन सादर करताना यावेळी राजकिशोर मोदी, माजी उपनगराध्यक्ष बबन लोमटे, मनोज लखेरा, महादेव आदमाने, धम्मा सरवदे, हाजी महमूद ,सुनील वाघाळकर , कचरू सारडा, मोईन शेख, अकबर पठाण यांच्यासह अनेक सहकारी उपस्थित होते. उपजिल्हाधिकारी यांच्या वतीने तहसीलदार विलास तरंगे तसेच मुख्याधिकारी प्रियांका टोंगे यांनी निवेदन स्वीकारले. उपजिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात अंबाजोगाई नगर परिषद प्रशासनाने राजकीय दबावापोटी व त्यांच्या सोयीनुसार प्रभाग रचना व मतदार याद्या तयार केलेल्या दिसून येत आहेत. प्रत्येक यादीमध्ये किमान २०० ते ५०० नावांची अफरातफर किंवा आदलाबदल केली आहे. शहरातील सर्वात मोठा गणल्या जाणारा प्रभाग क्रमांक १५ यामध्ये ४८०० मतदार दाखवले आहेत. तर दोन सदस्य असलेल्या प्रभागात ५८०० पेक्षा जास्त मतदार सामील केले आहेत. याबाबत मतदारांत संभ्रम निर्माण होत आहे. अंबाजोगाई नगर परिषद प्रशासन हे सत्ताधाऱ्यांच्या दबावाखाली येऊन काम करत असल्याची चर्चा दबक्या आवाजात नागरिकांतुन केल्या जात आहे. त्याचबरोबर काही प्रभागात ग्रामीण भागातील तथा शहराबाहेरील जसे की जोगाई वाडी व अन्य ठिकाणची ३००० ते ४००० नावे समाविष्ट केल्याचे आढळुन येत आहे. ती नावे वगळण्यात यावीत अशी मागणी देखील राजकिशोर मोदी यांनी आपल्या निवेदनातून केली**



आहे. दोन सदस्य असलेल्या प्रभागात (प्रभाग क्र. १२) ५८४९, (प्रभाग क्र. १०) ५५३०, (प्रभाग क्र. ४) ५४१२, (प्रभाग क्र. १)५३०३ असे मतदार दर्शविले आहेत. तर तीन सदस्य असणाऱ्या प्रभागात केवळ (प्रभाग क्र. १५) ४८७६ मतदार दर्शविले आहेत. त्यावरून असे निर्देशित होते की, हेतूपुरस्कर रित्या ज्या प्रभागात सत्ताधाऱ्यांना विरोध होणार आहे अशा प्रभागात कमी मतदार दर्शविले आहेत. तर विरोधकांच्या प्रभागात जास्तीत- जास्त मतदार नोंदविण्याचा प्रकार घडविण्यात आलेला असल्याचे दिलेल्या निवेदनात राजकिशोर मोदी यांनी नमूद केले आहे. तेंव्हा मतदार संख्येत केलेली ही असमानता आश्चर्य जनक असून, त्यावर मा. निवडणुक निर्णय अधिकारी साहेबांनी गांभीर्याने विचार करावा. असे न झाल्यास पुढील ८ दिवसात अमरण उपोषण किंवा अन्य कायदेशीर मार्गाचा पर्याय निवडावा लागेल **असा इशारा मोदी यांनी निवेदना द्वारे दिला आहे. अंबाजोगाई नगर परिषद प्रशासन तथा निवडणूक प्रशासनाने जाहीर केलेल्या प्रभाग रचनेमध्ये तसेच मतदार याद्यामध्ये केलेली असमानता तात्काळ दुरूस्त करण्यासाठी संबंधितास आदेशीत करण्याचे आवाहन राजकिशोर मोदी व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले आहे. उपजिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन सादर करताना प्रा शैलेश जाधव, जावेद गवळी, ऍड दयानंद लोंढाळ, अनिल पसारकर, बबन पाणकोळी, अशोक देवकर, काझी खयामोद्दिन , गोविंद पोतंगले, रशीद भाई,सय्यद ताहेर, सचिन जाधव, दत्ता सरवदे, महेश कदम, शाकेर काझी, अकबर पठाण, भीमसेन लोमटे, मतीनं जरगर, राम घोडके, मुन्ना पठाण, सुदाम देवकर, सुशील वाघमारे, महेबूब गवळी, दत्ता हिरवे, रफिक गवळी, जमदार पठाण, आकाश कऱ्हाड, शुभम लखेरा, अक्षय परदेशी, शरद काळे यांच्यासह अनेक सहकारी उपस्थित होते. निवेदन स्वीकारताना मुख्याधिकारी प्रियंका टोंगे यांनी जाहीर करण्यात आलेल्या मतदार यादीत अप्रत्यक्षपणे चुका झाल्याचे मान्य करत नजरचुकीने झालेल्या चुका या दुरुस्त करण्यात येतील व मतदारांमध्ये झालेला संभ्रम दूर करण्यात येईल असे राजकिशोर मोदी यांना सांगितले.**

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com